REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# "2020 राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा पारंपारिक, व्यावसायिक व अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मूल्यांकन मानांक यावर नॅक / एनबीए पीअर टीमद्वारे होणारे परिणाम".

**Prof. Dr. Haridas Jogdankar**
**Asst. Professor in Commerce and HOD Business Economics JASC College, Affiliated to Dr. BAMU. Aurangabad.**

## प्रस्तावना:-




"यूजीसी फिटनेस ऑफ कॉलेजेस फॉर रिसिव्हिंग ग्रँट्स" यावर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. केंद्र सरकारकडून अनुदान मिळवण्यासाठी नॅक / एनबीए मूल्यांकनात सहभागी होणे, एनआयआरएफ क्रमवारीत, प्राध्यापकांची किमान 75 टक्के पेक्षा जास्त पदे भरलेली असावेत असे निकष महत्त्वाचे आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) त्याबाबतच्या अधिकृत सूचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या पार्श्वभूमीवर या मार्गदर्शक व अधिकृत सूचना विद्यापीठ अनुदान आयोग कायदा 1956 अंतर्गत कलम 2 (एफ) नुसार केंद्रीय किंवा राज्याच्या कायद्याद्वारे स्थापन केलेल्या विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना लागू आहेत. उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्ता राखली जाण्यासाठी यूजीसीने सर्वच महाविद्यालयांना कलम 2 (एफ) अंतर्गत नोंदणी बंधनकारक करण्यात आल्याने सर्व खाजगी अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये परिनियमांची अंमलबजावणी करणे, अशा महाविद्यालयांना उत्तरदायी करणे यूजीसीला शक्य होणार आहे. या महाविद्यालयांना यूजीसी, केंद्र सरकार आणि अन्य वित्तपुरवठा संस्थांकडून निधी मिळण्यासाठी कलम 12 (बी) नुसार पात्रता (Eligibility) ठरविण्यात येते. 12 (बी) दर्जा महाविद्यालयांना केवळ निधीसाठी पात्र ठरवतो. प्रचलित नियमांनुसार पदवी, पदव्युत्तर पदवी, एक वर्षांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीचा पदविका अभ्यासक्रम केंद्र सरकारकडून निधी मिळण्यासाठी पात्र ठरतात.(1)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या अनुषंगाने मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांच्या अनुदानासाठी यूजीसीकडून नवे निकष व मार्गदर्शक सूचना / आचार संहिता. मात्र नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्रतेसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त पुढील प्रमाणे अन्य निकषही लागू केलेले आहेत.

1) नॅक / एनबीए कडून मूल्यांकन करून मानांकाची ग्रेड मिळणे बंधनकारक आहे. तीनपेक्षा जास्त अभ्यासक्रम राबवणाऱ्या संस्थेतील किमान 60 टक्के अभ्यासक्रमांचे मूल्यांकन नॅक / एनबीए कडून झालेले असणे आवश्यक असल्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तीनपेक्षा कमी अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयातील प्रत्येक पात्र अभ्यासक्रमाचे मूल्यांकन झालेले असणे आवश्यक आहे

2) नॅक / एनबीए कडून मूल्यांकन झालेले नसल्यास एनआयआरएफ क्रमवारीमध्ये किमान दोन किंवा पाचवेळा स्थान मिळालेले असले पाहिजे.

3) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुणांच्या मूल्यमापनामध्ये व विद्यापीठातील ऑनरेकॉर्ड गुणांमध्ये काही तफावत आढळल्यास अशावेळी सदर महाविद्यालयना सी ग्रेडच्या वरती मूल्यांकन मिळत नाही. याकरता नॅक / एनबीए फीडबॅक मॉनिटरिंग सेल कडून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या यादीनुसार काही विद्यार्थ्यांचे विद्यापीठातील रेकॉर्ड सॅम्पल म्हणून तपासले जाते.

4) ऑनलाइन / ऑफलाइन पद्धतीने जी माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिकविल्या जाणाऱ्या शैक्षणिक पद्धती विषयी दाखवली ती ऐतिहासिक, पारंपारिक, आधुनिक, अत्याधुनिक व तंत्रज्ञानावर यापैकी ज्यावर आधारित आहेत त्यापैकी विद्यार्थ्यांना शिकविल्या जाणाऱ्या शैक्षणिक पद्धती या स्थानिक पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर, जागतिक पातळीवर विद्यार्थ्यांना रोजगार अथवा उत्पन्न मिळण्यास किती उपयुक्त आहेत का याचे मूल्यमापन केले जाते. याकरता प्रत्यक्ष विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला जातो. यासाठी कोणत्याही शिक्षकांचा DTR (Daily Teaching Report.) तपासला जात नाही, कारण DTR मध्ये शिक्षकांनी सिलॅबस प्रमाणे माहिती भरून ठेवलेली असते, असं नॅक / एनबीए पीअर टीम समजून घेतात.

5) महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबत एखादी तक्रार / मागणी न्यायालयात प्रलंबित असेल तर वेतनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे विकासात्मक शासकीय निमशासकीय अनुदान मिळणार नाही उदा. DBT, DST इत्यादी.

6) कोणत्याही महाविद्यालयीन मागासवर्गीय शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील अन्याया बाबतची माहिती यूजीसीला मिळाल्यास सदर महाविद्यालयास विकासात्मक अनुदान यूजीसीकडून मिळणार नाही उदा. RUSA, PM-USHA इत्यादी. जर का मिळाले तर मिळालेल्या निधीचा पूर्ण वापर न झाल्यास तो परत करण्याचे प्रतिज्ञापत्रही द्यावे लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे

7) महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यां बाबत एखादी वेतना विषयक तक्रार / मागणी न्यायालयात प्रलंबित असेल, तर नॅक / एनबीए कडून मूल्यांकन प्रक्रियेत बी पेक्षा जास्तीचा मानांक ग्रेड दिला जाणार नाही अथवा मागील मूल्यांकनाच्या वेळी जो ग्रेड दिला आहे त्या ग्रेड पेक्षा जास्तीचा ग्रेड दिला जाणार नाही.

8) महाविद्यालयांच्या विरोधात महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची वेतनाबाबत व पदोन्नती बाबतची एखादी तक्रार न्यायालयात प्रलंबित असेल तर अशा महाविद्यालयानी चांगल्या व सर्वोत्तम ग्रेडची अपेक्षा बाळगू नये, या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत त्यांना चांगला व सर्वोत्तम मानांकचा ग्रेड मिळणार नाही.

9) महाविद्यालयीन निवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी यापैकी कोणीही एखाद्याने संस्था प्रशासनाबाबत एखादी प्रशासकीय तक्रार गोपनीय पद्धतीने नॅक / एनबीए मूल्यांकन समितीस कळविली असेल तर नॅक / एनबीए मूल्यांकन प्रक्रियेत बी पेक्षा जास्तीचा मानांक ग्रेड दिला जाणार नाही अथवा मागील मूल्यांकनाच्या वेळी जो मानांक ग्रेड दिला आहे त्या मानांक ग्रेड पेक्षा जास्तीचा मानांक ग्रेड दिला जाणार नाही.

10) महाविद्यालयातील प्रत्येक विभागांतर्गत फुल टाईम एकूण मंजूर पदांपैकी किमान 75 टक्के पेक्षा अधिक पदे भरलेली असणे आवश्यक व गरजेचे आहे, त्यात सर्व प्रकारचे सामाजिक मागासवर्गीय आरक्षण धोरणासह प्रत्येक विभागातून 33% महिला आरक्षणाचे पालन झालेले असणे बंधनकारक आहे.

11) शिक्षकांना केंद्र, यूजीसी किंवा राज्य सरकारच्या धोरणानुसार नियमीत वेतन देणेही बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्तीनुसार त्यांना विहित कालावधीत पदोन्नतीस अनुसरून वरिष्ठ वेतनश्रेणी व सुधारित वेतनश्रेणी दिली गेली आहे किंवा नाही या बाबतीतही नॅक / एनबीए कडून सकारात्मक व नकारात्मक विचार केला जातो याचा मूल्यांकन प्रक्रियेतील मानांक ग्रेड वरती परिणाम होतो. या कारणामुळे अनेक महाविद्यालयांना कमी दर्जाचे ग्रेडेशन दिले जाते.

12) M.Phil. / Ph.D. प्राप्त शिक्षक कर्मचाऱ्यांची विहित कालावधीतील पदोन्नतीस अनुसरून वरिष्ठ वेतनश्रेणी व सुधारित वेतनश्रेणी दिली गेली नसल्यास मूल्यांकनामध्ये नकारात्मकता येऊन सदर महाविद्यालयास गुणदान कमी मिळून चांगला मानांक ग्रेड मिळण्यावर परिणाम होतो.

13) अनुदानित महाविद्यालयात एखादा शिक्षक कर्मचारी प्रोफेसर या पदावर कार्यरत आहे आणि असे असतानाही जर का साठ वर्षापेक्षा जास्त वयाचे सेवानिवृत्त शिक्षक व सेवानिवृत्त प्राचार्य या कर्मचाऱ्याना पुन्हा प्राचार्य या पदावर पुनर्नियुक्ती दिली अथवादाखवले असल्यास अशा अनुदानित महाविद्यालयाने कोणत्याही प्रकारे चांगल्या मानांक ग्रेडची अपेक्षा ठेवू नये. कारण अनेक संस्थाचालक आर्थिक कमाईच्या हेतूने स्वतःच्या फायद्यासाठी आपल्या मर्जीतील सेवानिवृत्त शिक्षक / सेवानिवृत्त प्राचार्य यांना शासकीय नियमांचा आधार घेऊन अनुदानित महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी ठेवताना आढळून येतात. असे करण्याने समाजातील पात्रताधारक व्यक्तींवर अन्याय होतो आणि महाविद्यालय समाजाप्रती कार्य करत नाही हे सिद्ध होऊन महाविद्यालयास चांगली ग्रेड मिळत नाही. याबाबतीत अनुदानित महाविद्यालयांच्या संस्था प्रमुखांनी चांगल्या प्रकारे निर्णय घ्यायला हवेत. परंतु पात्रता धारक प्रभारी किंवा इन्चार्ज प्राचार्य असेल तर महाविद्यालयास चांगली ग्रेड मिळते. त्याचप्रमाणे एखाद्या मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विहित कालावधीत पदोन्नतीसाठी पात्र होत असताना अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्था संगनमताने हेतूपुरस्कृत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची पदोन्नती प्रलंबित ठेवत असतील या कारणास्तव देखील अनुदानित महाविद्यालयाचे ग्रेडेशन कमी होते. याबाबत ही संस्था प्रमुखांनी काळजी घ्यावी लागते.

14) सेवानिवृत्त शिक्षक व सेवानिवृत्त प्राचार्य या कर्मचाऱ्याना पूर्ण मानधनावर नवीन विनाअनुदानित पारंपरिक, यांत्रिकी व अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पहिल्या पाच वर्ष कालावधी करिता सेवा करण्याची संधी दिल्यास नॅक / एनबीए टीमकडून अशा नवीन विनाअनुदानित महाविद्यालयाना अतिरिक्त पाच ग्रेस / अधिकचे गुण मिळू शकतात.

15) यांत्रिकी, अभियांत्रिकी व पारंपारिक महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यापैकी एखादा कर्मचारी जर का Professional PG Courses eg. M.Ed., MBA, LL.M., ME., M.Tech, M.Pharm., Ph.D. etc. कोर्स करण्याकरिता प्रवेश घेऊन कोर्स करत असेल तर सदर कोर्स करण्याकरिता त्यास रजेची आवश्यकता असेल अशा वेळेस कमीत कमी सहा महिन्यासाठी व जास्तीत जास्त तीन वर्षासाठी अनुदानित महाविद्यालयाने 100% वेतनासह व विनाअनुदानित महाविद्यालयाने 50% वेतनासह रजा मंजूर करावी. याकरिता सदर महाविद्यालयास नॅक / एनबीए कडून मूल्यांकनासाठी सकारात्मक पद्धतीने विशेष गुणदान करून चांगला मानांक ग्रेड दिला जातो. उदा. B+ ऐवजी B++, B++ ऐवजी A, आणि A ऐवजी A+ ग्रेडेशन दिले जाते.

16) यांत्रिकी, अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक कर्मचारी (Faculties) यापैकी 65% पेक्षा जास्त शिक्षक कर्मचारी (Faculties) जर का राज्य व राष्ट्रीय पातळीवरील म्हणजेच Teachers Professional Eligibility Examination Certificates Qualified eg. CSIR NET, UGC NET, SET, GATE, GPAT, ICAR AICE (JRF/SRF), etc. कोर्सेस त्यांच्या विषयाशी संबंधित अथवा त्या विषयाशी संबंधित दुसऱ्या विषयात पात्र असतील तर याकरिता सदर महाविद्यालयाना नॅक / एनबीए कडून मूल्यांकनासाठी सकारात्मक पद्धतीने विशेष गुणदान करून चांगला मानांक ग्रेड दिला जातो. उदा. B+ ऐवजी B++, B++ ऐवजी A, आणि A ऐवजी A+ ग्रेडेशन दिले जाते. याच प्रकारे पारंपरिक महाविद्यालयीन शिक्षक कर्मचारी (Faculties) यापैकी 75% पेक्षा जास्त शिक्षक कर्मचारी (Faculties) जर का राज्य व राष्ट्रीय पातळीवरील म्हणजेच Teachers Professional Eligibility Examinations Certificates Qualified eg. CSIR NET, UGC NET, SET, Ph.D., etc. कोर्सेस त्यांच्या विषयाशी संबंधित अथवा त्या विषयाशी संबंधित दुसऱ्या विषयात पात्र असतील तर याकरिताही सदर महाविद्यालयांना नॅक कडून मूल्यांकनासाठी सकारात्मक पद्धतीने विशेष गुणदान करून चांगला मानांक ग्रेड दिला जातो. उदा. B+ ऐवजी B++, B++ ऐवजी A, आणि A ऐवजी A+ ग्रेडेशन दिले जाते.

17) सर्व प्रकारच्या महाविद्यालयीन शिक्षक कर्मचाऱ्यांना संशोधन अहवाल, संशोधन पत्रिका जर्नल्स मधून प्रसिद्ध करण्याकरिता संबंधित महाविद्यालयाने आर्थिक मदत केली असेल तर अशा वेळेसही सदर महाविद्यालयाना नॅक / एनबीए कडून मूल्यांकनात सकारात्मक पद्धतीने जास्तीचे गुणदान मिळण्याने चांगला मानांक ग्रेड मिळू शकतो. महाविद्यालयीन शिक्षक कर्मचाऱ्यांना संदर्भ ग्रंथ, टेक्स्ट बुक प्रकाशित करण्याकरिता संबंधित महाविद्यालयाने आर्थिक मदत केली असेल तर अशा वेळेसही सदर महाविद्यालयाना नॅक / एनबीए कडून मूल्यांकनात जास्तीचे गुणदान मिळून उत्तम मानांक मिळण्यास मदत होते.

18) जी वास्तव माहिती ऑनलाइन / ऑफलाइन पद्धतीने सादर केलेली आहे, तीच वास्तव माहिती प्रत्यक्ष तपासणीच्या वेळेस सादर केल्यास चांगल्या प्रकारचे गुण मिळतात. उदा. कर्मचाऱ्यांचे पगार पत्रक, विद्यार्थी हजेरी पत्रक, विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन बाबतची कागदपत्रे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शासकीय शिष्यवृत्ती संबंधित नोंदीसह माहिती, गरीब होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केल्याची कागदपत्रे, महाविद्यालय व कॉलेजेस यांच्या तपासणीच्या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांपैकी केवळ तीन टक्के विद्यार्थ्यांकडे उत्पन्नाचे साधन अथवा उपजीविकेचा / जीवन जगण्याचा मार्ग असल्याचे पुरावे लागतात व मागील पाच वर्षात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक कार्यक्रमातील छायाचित्रे / फोटो मधील जो पोशाख / ड्रेस असतो त्याच प्रकारचा पोशाख इ. प्रत्यक्ष भेटीतील तपासणीच्या वेळेस असणे गरजेचे आहे.

या लेखातील वरील एक ते आठरा या घटकांचा प्राचार्य व संस्था चालकांनी सकारात्मक पद्धतीने अभ्यास करून संस्था चालवीत असलेली महाविद्यालये व कॉलेजेस यांच्या बाबतीत योग्य त्यावेळेस सकारात्मक निर्णय घ्यावेत जेणेकरून महाविद्यालये व कॉलेजचे डीग्रेडेशन होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

शोधनिबंधातील एक ते आठरा या सर्व निकष, मार्गदर्शक सूचना अनुसरून व ईतर गोपनीय माहितीची प्रत्यक्ष कागदोपत्री नोंदणीकृत ऑनरेकॉर्डवर असताना त्याचे क्रॉस व्हेरिफिकेशनच्या माध्यमातून मूल्यांकन होवून नॅक द्वारा मानांकन मिळालेली विद्यापीठे आणि महाविद्यालये.

### विद्यापीठे (Universities):-

1) SRM Institute of Science and Technology (SRM Deemed to be University) Tamil Nadu. (Grade A++)
2) Gauhati University Assam. (Grade A)
3) National Law School of India University Karnataka. (Grade A)
4) Manonmaniam Sundarnar University Tamil Nadu. (Grade A)
5) Assam Don Bosco University Assam. (Grade A)

### महाविद्यालये (Colleges):-

1) Dr.Mahalingam College of Engineering and Technology Tamil Nadu. (Grade A++)
2) Vignana Jyothi Institute of Engineering and Technology Hyderabad. (Grade A++)
3) Lady Irwin College Delhi. (Grade A+)
4) Godavari Institute of Engineering & Technology Andhra Pradesh. (Grade A+)
5) Institute of Management Studies Maharashtra. (Grade A+)
6) Apeejay College of Fine Arts Punjab. (Grade A+)
7) JSS Academy of Higher Education and Research Karnataka. (Grade A+)
8) Shri Shankaracharya Technical Campus Chhattisgarh. (Grade A)
9) Coimbatore Institute of Technology Tamil Nadu. (Grade A)
10) St. Joseph's College Kerala. (Grade B++)
11) Jawahar Aarts, Science and Commerce College Andur, Maharashtra. (Grade B++)
12) N. K. Orchid College Of Engg. & Technology, Solapur. Maharashtra. (Grade B+)

याचप्रमाणे सर्व निकष, मार्गदर्शक सूचना व ईतर गोपनीय माहितीची प्रत्यक्ष कागदोपत्री नोंदणीकृत ऑनरेकॉर्डवर असताना त्याचे क्रॉस व्हेरिफिकेशन माध्यमातून मूल्यांकन होवून एनबीए द्वारा मानांकन मिळालेली यांत्रिकी व अभियांत्रिकी विद्यापीठे आणि महाविद्यालये.

### यांत्रिकी व अभियांत्रिकी विद्यापीठे (Engineering & Technology Universities):-

1) Jawaharlal Nehru Technological University - (JNTUH), Hyderabad.

2) Parul University. Vadodara, Gujarat.

### यांत्रिकी व अभियांत्रिकी महाविद्यालये (Engineering & Technology Colleges):-

1) Sathyabama Institute of Science and Technology, Chennai. Tamil Nadu.

2) Kalasalingam Academy of Research and Education, Krishnankovil. Tamil Nadu.

3) Bannari Amman Institute of Technology - (BIT), Sathyamangalam. Tamil Nadu.

4) Ramaiah Institute of Technology. (RIT), Bangalore. Karnataka. (NBA Accredited & NIR Franking.)

5) Sathyabama Institute of Science and Technology, Chennai.

6) Rajalakshmi Engineering College (REC), Chennai.

7) Sri Krishna College of Engineering and Technology - (SKCET), Coimbatore. Tamil Nadu.

8) Dr. Ambedkar Institute of Technology - (AIT), Bangalore. Karnataka.

9) Dayananda Sagar College of Engineering - (DSCE), Bangalore. Karnataka.

10) Nitte Meenakshi Institute of Technology - (NMIT), Bangalore.

### नॅक / एनबीए मूल्यांकनाचे फायदे.

उच्च शिक्षण देत असलेल्या सर्व महाविद्यालयांसाठी नॅक / एनबीए मूल्यांकन दर्जा अनिवार्य आहे. नॅक / एनबीए ची प्रमुख भूमिका म्हणजे ते देत असलेल्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार महाविद्यालये, संस्था आणि विद्यापीठे यांचे मूल्यांकन करणे आणि त्यांची मान्यता घेणे ही आहे. नॅक / एनबीए मान्यता वापरून, विद्यार्थी उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ओळखू शकतात.

### महाविद्यालयांसाठी फायदे.

नॅक / एनबीए मूल्यांकन मान्यता महाविद्यालयांसाठी प्रमुख फायद्यांमध्ये नॅक / एनबीए उच्च शिक्षण संस्था ओळखणे आणि त्यांना माहितीपूर्ण पुनरावलोकन प्रक्रियेद्वारे त्यांची ताकद, संधी आणि कमकुवतता जाणून घेण्यास मदत करणे समाविष्ट आहे.

### महाविद्यालयांसाठी इतर फायदेशीर घटकांचा समावेश:-

NAAC मान्यता नियोजन आणि संसाधनांच्या वाटपाची अंतर्गत क्षेत्रे ओळखण्यात मदत करते. NAAC मान्यता एजन्सींना त्यांच्या इच्छित उच्च शिक्षण संस्थांना निधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मदत करेल. NAAC मूल्यांकन आणि मान्यता शैक्षणिक संस्थांना नवीन आणि नाविन्यपूर्ण कार्यपद्धती सुरू करण्यास मदत करेल.

### विद्यार्थ्यांसाठी फायदे:-

NAAC मान्यता आणि त्याची श्रेणी विद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेचे शिक्षण, अध्यापन, पायाभूत सुविधा आणि संशोधन यशांसह महाविद्यालय शोधण्यात मदत करते. याव्यतिरिक्त, NAAC ग्रेड उच्च-गुणवत्तेची पदवी देणाऱ्या सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाविद्यालयांसह विद्यार्थ्यांना मदत करतात.

### शिफारशी:-

1) नॅक / एनबीए कडून मूल्यांकन करून घ्यावे.

2) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुणांच्या मूल्यमापनामध्ये वविद्यापीठातील ऑनरेकॉर्ड गुणांमध्ये कोणत्याही प्रकारे तफावत ठेवू नये.

3) महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबतच्या न्यायालयीन तक्रारी तातडीने मिटवून घ्याव्यात.

4) शासकीय, निमशासकीय व अनुदानित महाविद्यालयांमध्ये निवृत्त फॅकल्टीना प्राचार्य पदावर नियुक्ती देण्यासाठी प्रतिबंध करावा.

5) 33% महिला आरक्षणासह 75% पेक्षा जास्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची महाविद्यालयात भरती करावी.

6) शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांचे शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. eg. Professional Eligibility Examination Certificates Qualified eg. M.Ed., MBA, LL.M., ME., M.Tech, M.Pharm., Ph.D., CSIR NET, UGC NET, SET, GATE, GPAT, ICAR AICE (JRF/SRF), etc.

7) सर्व प्रकारच्या महाविद्यालयीन शिक्षक कर्मचाऱ्यांना संशोधन अहवाल, संशोधन पत्रिका जर्नल्स मधून प्रसिद्ध करण्याकरिता तसेच संदर्भ ग्रंथ, टेक्स्ट बुक प्रकाशित करण्याकरिता संबंधित महाविद्यालयाने आर्थिक मदत करावी.

8) जी वास्तव माहिती ऑनलाइन / ऑफलाइन पद्धतीने सादर केलेली आहे, तीच वास्तव माहिती प्रत्यक्ष तपासणीच्या वेळेस नॅक / एनबीए समन्वयकाने टीम समोर सादर करावी.

9) प्रत्यक्ष तपासणीच्या वेळेस नॅक / एनबीए टीम समोर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकोपा / एकत्रितपणा दाखविला पाहिजे.

### सारांश:-

नॅक / एनबीए टीम / समितीकडून तपासणी करताना शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सोयी सुविधा, तसेच त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ, वरिष्ठ वेतनश्रेणी लागू, वरिष्ठ श्रेणी पदोन्नती इत्यादींवर अधिक प्रमाणात भर दिला जातो. मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावर अन्याय होतात किंवा नाही याचीही पडताळणी नॅक / एनबीए समितीकडून केली जाते. याचप्रमाणे व्यापार, उद्योग, व्यावसायिक व औद्योगिक संस्था आणि माजी विद्यार्थी यांच्या सहकार्यातून महाविद्यालयांचे प्राध्यापक रोजगाराच्या परिणामावर आधारित शिक्षण, विद्यार्थीकेंद्री उपक्रम व संशोधन या पातळीवर प्रशंसनीय कामगिरी करत असतील. विद्यार्थी उद्योगस्नेही होण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा, पूरक कोर्सेस व व्यावसायिक व्यासपीठ या सर्वांची तपासणी करताना नॅक / एनबीए समिती विशेष दखल घेतात, असे अनेक महाविद्यालयांचे मूल्यांकन करून मनांक प्रदान करताना दिसून आलेले आहे.

### संदर्भ:-

(1) The University Grants Commission (UGC) provides financial assistance to eligible colleges which are included under Section 2(f)* and declared fit to receive central assistance (UGC grant) under Section 12 (B)** of UGC Act, 1956 as per approved pattern of assistance under various schemes.

2) 7) The University Grants Commission Act, 1956.

3) http://naac.gov.in/index.php/en/

4) https://www.ugc.gov.in/

5) https://www.acgedu.com/

6) https://engineering.careers360.com/colleges/ranking/top-engineering-colleges-in-maharashtra

7) https://srmcem.ac.in/

8) https://en.m.wikipedia.org/wiki/National_Assessment_and_Accreditation_Council

9) https://en.m.wikipedia.org/wiki/National_Board_of_Accreditation